दिनांक :- ३१/०१/२०२०

**- : जाहिर आवाहन :-**

विषय :-पुणे मनपाचे रुग्णालयांमध्ये तज्ञ बंधपत्रित वैदयकीय अधिकारी (पी.जी.बॉन्ड) व बंधपत्रित वैदयकीय अधिकारी (यु.जी.बॉन्ड) यांचे सेवेबाबत.

संदर्भ :-१. मा.स्थायी समिती ठराव क्र.२१९१,दि.२६/०२/२०१५.
२.मा.स्थायी समिती ठराव क्र.२०६३,दि.१४/०१/२०२०.
३.मा.स्थायी समिती ठराव क्र.२०६२,दि.१४/०१/२०२०.

पुणे महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत शहरातील ४९ बाहयरुग्ण विभाग, १८ प्रसुतिगृह, ०१ सर्वसाधारण रुग्णालय, ०१ सांसर्गिक रोग रुग्णालय, ०२ ई.हेल्थ सेंटर, ०१ स्मार्ट क्लिनिक, ०२ फिरते दवाखाने, ०१ लसीकरण केंद्रामार्फत नागरिकांना वैदयकीय सेवा व सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. शहराच्या विस्तारीकरणामुळे या सर्व दवाखाने/रुग्णालयांमधून वैदयकीय सेवा घेणाऱ्या नागरिकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने संदर्भ क्रमांक (१) अन्वये पुणे महानगरपालिका आरोग्य विभागाकडे तज्ञ बंधपत्रित वैदयकीय अधिकारी (पी.जी.बॉन्ड) डॉक्टर्सच्या एकूण १२४ पदांना मान्यता मिळालेली असुन पुणे महानगरपालिकेमध्ये तज्ञ बंधपत्रीत वैदयकीय अधिकारी (पी.जी.बॉन्ड) यांची ३६४ दिवसांचे कालावधीकरिता सेवा घेण्यात येत असुन त्यांना संदर्भ क्र.२ चे मा.स्थायी समितीचे ठरावान्वये तज्ञ बंधपत्रित वैदयकीय अधिकारी (पी.जी.बॉन्ड) यांना दरमहा एकत्रित रक्कम रु.७१६९७/- (अक्षरी रक्कम रु.एक्काहत्तर हजार सहाशे सत्त्याण्णव फक्त) देणेस मान्यता देण्यात आलेली असुन त्याप्रमाणे दरमहा रक्कम अदा करणेत येईल.

तसेच शासकीय वैदयकीय महाविदयालयामधून एम.बी.बी.एस.पदवी उत्तीर्ण झालेल्या वैदयकीय अधिकारी (एकुण मान्य पदे ५७) यांना पुणे महानगरपालिकेच्या दवाखान्यांमध्ये बंधपत्रित वैदयकीय अधिकारी (यु.जी.बॉन्ड) म्हणून ३६४ दिवसांचे कालावधीकरिता रुजु करुन घेणेस पुणे महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीने संदर्भ क्र.३ चे ठरावान्वये मान्यता दिलेली असुन सदर वैदयकीय अधिकारी यांना दरमहा एकत्रित रक्कम रु.५२०००/- फक्त (अक्षरी रक्कम रु.बावन्न हजार फक्त) देण्यात येणार आहे.

तरी शासकीय वैदयकीय महाविदयालयांमधून एम.बी.बी.एस. व पदवी/पदव्युत्तर शिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेले व नियमाप्रमाणे आंतरवासिता पुर्ण झालेले वैदयकीय विदयार्थी यांना आवाहन करण्यात येते कि,आपण पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामध्ये बंधपत्रित सेवेत रुजु होऊन आपली बंधपत्रित सेवेचा कालावधी पुर्ण करणेस विनंती आहे. नियमाप्रमाणे तज्ञ बंधपत्रित वैदयकीय अधिकारी/बंधपत्रित वैदकीय अधिकारी यांना अनुभवाचा दाखला व दरमहा वेतन पुणे मनपा मार्फत अदा करण्यात येईल याची नोंद घेऊन दि.०१/०२/२०२० पासुन तज्ञ बंधपत्रिंत वैदयकीय अधिकारी/बंधपत्रित वैदयकीय अधिकारी यांनी पुणे महानगरपालिकेच्या pmc.gov.in या वेबसाईटवर दिल्याप्रमाणे अर्ज व आवश्यक कागदपत्रे घेऊन सदर अर्ज पुणे महानगरपालिका भवन,आरोग्य विभाग,तिसरा मजला,मेडिकल युनिट विभाग,शिवाजीनगर पुणे ४११००५ येथे सादर करावा त्यानंतर सदर अर्जाची छाननी करुन नियमाप्रमाणे नियुक्ती देण्यात येईल. (अधिक माहितीसाठी ०२०-२५५०१२३६ मेडिकल युनिट विभाग येथे संपर्क साधावा)

तज्ञ बंधपत्रित वैदयकीय अधिकारी/बंधपत्रित वैदयकीय अधिकारी रिक्त पदांचा तक्ता

| पुणे महानगरपालिका आरोग्य विभाग<br>बंधपत्रित वैदयकीय अधिकारी (पी.जी.बॉन्ड) मान्य पदांची माहिती<br>दरमहा एकवट वेतन रक्कम रु.७१६९७/- फक्त | | |
|---|---|---|
| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदे |
| १ | आय. सी. यु फिजिशियन/ इंटेंसिव्हीस्ट | ७ |
| २ | फिजिशियन | १० |
| ३ | निवासी फिजिशियन | ०४ |
| ४ | कार्डीऑलॉजिस्ट | ०१ |
| ५ | शल्य विशारद | १० |
| ६ | युरो सर्जन | ०१ |
| ७ | न्युरो सर्जन | १ |
| ८ | बालरोग तज्ञ | ०९ |
| ९ | नवजात अर्भक तज्ञ | ०२ |
| १० | पॅथोलॉजिस्ट | ०८ |
| ११ | रेडिओलॉजिस्ट | १५ |
| १२ | चेस्ट स्पेशालिस्ट | ०२ |
| १३ | स्त्री रोग तज्ञ | ०५ |
| १४ | बालरोग शल्यविशारद | ०५ |
| १५ | भूल तज्ञ + बधिरीकरण तज्ञ | ०६ |
| १६ | कान नाक घसा तज्ञ | ०३ |
| १७ | नेत्र शल्य चिकित्सक | ०० |
| १८ | अस्थिव्यंग तज्ञ | ०२ |
| १९ | मानसोपचार तज्ञ | ०१ |
| २० | मायक्रोबायोलॉजिस्ट | ०२ |
| २१ | दंतशल्य चिकित्सक | ०६ |

| पुणे महानगरपालिका आरोग्य विभाग<br>बंधपत्रित वैदयकीय अधिकारी (यु.जी.बॉन्ड)<br>दरमहा एकवट वेतन रक्कम रु.५२०००/-फक्त | | |
|---|---|---|
| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदे |
| १. | वैदयकीय अधिकारी | ५७ |

**आवश्यक कागदपत्रे :-**

१.एम.बी.बी.एस.प्रमाणपत्र/गुण पत्रिका तिनही वर्षाच्या (Marklist)

२.पदवी/पदविका प्रमाणपत्र/गुणपत्रिता (Degree Certificate)

3.Bonded candidate Certificate or Affidavite

४.महाराष्ट्र वैदयकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र (Permanent Registration)

५.भारतीय वैदयकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र (Indian Medical Counsil Registration)

६.आंतरवासिता प्रमाणपत्र (Internship Complition Certificate)

७.जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र (Cast Certificate and Cast Validity)

८.अनुभवाचा दाखला (Experience Certificate)

९.वयाचा दाखला ( Age Certificate)/आधार कार्ड/पॅन कार्ड/पासपोर्ट साईज फोटो १

**(डॉ.रामचंद्र हंकारे)**
**आरोग्य प्रमुख**
**पुणे महानगरपालिका**

# अर्जाचा नमुना

पासपोर्ट साईज फोटो

प्रति, दिनांक :-

मा.आरोग्य अधिकारी

पुणे महानगरपालिका,पुणे

**विषय :-बंधपत्रित वैदयकीय अधिकारी (पी.जी.बॉन्ड/यु.जी.बॉन्ड) गट अ या पदासाठी अर्ज.**

(पी.जी.बॉन्ड एकत्रित वेतन रक्कम रु.७१६९७/-फक्त व यु.जी.बॉन्ड एकत्रित वेतन रक्कम रु.५२०००/-फक्त)

उपरोक्त नियुक्तीकरिता माझ्या वैयक्तिक माहिती व कागदपत्रे खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

१) उमेदवारांचे संपुर्ण नांव :-------------------------------------------

२) संपुर्ण पत्ता पिनकोडसह :-------------------------------------------

३) जन्मदिनांक :-  /  /  भ्रमणध्वनी क्रमांक :-

४) जातीचा प्रवर्ग :- अ.जा./अ.ज./विजा-अ/भ.ज.-ब/भज-क/भज-ड/विमाप्र/इमाव/खुला

५) शैक्षणिक अर्हता (तांत्रिक शिक्षणासह) जात व पोटजात :-

६) महाराष्ट्र वैदयकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक व सन

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | महाविदयालयाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी | प्रयत्न संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एम.बी.बी.एस.-वर्ष १ | | | | | |
| २ | एम.बी.बी.एस.-वर्ष २ | | | | | |
| ३ | एम.बी.बी.एस.-वर्ष ३ | | | | | |
| ४ | पदव्युत्त्तर/पदविका | | | | | |

७) शासकीय संस्थेतील पूर्वानुभव असल्यास त्याचा तपशील

| अ.क्र. | संस्थेचे नाव | कधीपर्यंत | कधीपर्यंत | एकुण कालावधी | मानधन/वेतन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

मी प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो/देते की,वर नमुद केलेली माहिती खरी आहे.ती कोणत्याही प्रकारे खोटी आढळल्यास माझी उमेदवारी निवडीच्या टप्प्यावर रद्द ठरेल याची मला जाणीव असून मी दंडात्मक कार्यवाहीस पात्र ठरेन.

ठिकाण :- दिनांक :-

उमेदवारांची स्वाक्षरी

सोबत :-

१ एम.बी.बी.एस.प्रमाणपत्र/गुण पत्रिका तिनही वर्षाच्या (Marklist)

२ पदवी/पदविका प्रमाणपत्र/गुणपत्रिता (Degree Certificate),Bonded Candidate Certificate

३ महाराष्ट्र वैदयकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र/भारतीय वैदयकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र (Permanent Registration)

४ आंतरवासिता प्रमाणपत्र (Internship Complition Certificate)

५ जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र (Cast Certificate and Cast Validity)

६ अनुभवाचा दाखला (Experience Certificate)

७ वयाचा दाखला (Age Certificate)/पासपोर्ट साईज फोटो/आधार कार्ड/पॅन कार्ड

डॉ.----------------------

पत्ता :----------------------

पिनकोड ----------------------

भ्रमणध्वनी क्र.

दिनांक :-

ईमेल आयडी

प्रति,

मा.आरोग्य अधिकारी

पुणे महानगरपालिका,पुणे

विषय :-बंधपत्रित उमेदवार (पी.जी.बॉन्ड/यु.जी.बॉन्ड) म्हणुन पूर्वी नेमणूक स्विकारली नसलेबाबत.

महोदय,

मी डॉ.------------------------------------------विनंतीपुर्वक अर्ज करतो/करते की,माझे आंतरवासीयता प्रशिक्षण सन ------मध्ये पूर्ण झालेले असून मी बंधपत्रित उमेदवार म्हणून सेवा केलेली आहे/नाही. मला बंधपत्रीत उमेदवार (पी.जी.बॉन्ड/यु.जी.बॉन्ड) म्हणून पूर्वी नियुक्ती आदेश मिळालेले आहेत/नाहीत. यापुर्वी मी ------------------- येथे --------दिवस बंधपत्रित सेवा केलेली आहे त्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र जोडत आहे.

बंधपत्रित उमेदवार (पी.जी.बॉन्ड/यु.जी.बॉन्ड) म्हणून नियुक्ती मिळणकामी सदरहू अर्ज सादर केला आहे.वरील माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझेविरुध्द होणाऱ्या कोणत्याही कारवाईस मी स्वतः जबाबदार राहील.

आपला/आपली विश्वासू,

(डॉ.---------------)

आरोग्य विभाग,पुणे महानगरपालिका,पुणे

**बंधपत्रित वैदयकीय अधिकाऱ्यांचे मुळ प्रमाणपत्र तपासणीचे विवरण पत्र**

**वैदयकीय अधिकाऱ्याचे नांव :-डॉ.----------------------------------**

**पत्ता :---------------------------------------------**

**भ्रमणध्वनी क्रमांक :-** **ईमेल आयडी :-----------------**

**(कार्यालयीन कामकाजासाठी)**

| अ.क्र. | तपशील | आहे | नाही | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | एम.बी.बी.एस.प्रमाणपत्र/गुणपत्रिका तिनही वर्षाच्या (Marklist) | | | |
| २ | पदवी/पदविका प्रमाणपत्र/गुणपत्रिता (Degree Certificate) | | | |
| ३ | Bonded Candidate certificate | | | |
| ४ | महाराष्ट्र वैदयकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र (Permanent Registration) | | | |
| ५ | भारतीय वैदयकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र (Indian Medical Counsil Registration) | | | |
| ६ | आंतरवासिता प्रमाणपत्र (Internship Complition Certificate) | | | |
| ७ | जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र (Cast Certificate and Cast Validity) | | | |
| ८ | अनुभवाचा दाखला (Experience Certificate) | | | |
| ९ | वयाचा दाखला (Age Certificate) | | | |
| १० | आधार कार्ड/पॅन कार्ड/फोटो | | | |

(श्रीमती.सोनाली माळी)
वरीष्ठ लिपिक
पुणे महानगरपालिका

(संजय कल्याणकर)
प्रशासन अधिकारी (आरोग्य कार्यालय)
पुणे महानगरपालिका

(डॉ.अंजली साबणे)
सहाय्यक आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

(डॉ.रामचंद्र हंकारे)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका